सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३९ | शुक्रवार, दि. २२ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५२६००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४२६००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११७८००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६६०/-
भाव प्रती १० ग्राम




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर भारतात उन्हाळ्यात उष्मा असह्य होत असताना सुरू होतो नऊ दिवसांचा भयंकर काळ. ' नवतपा ' म्हणून ओळखला जाणाऱ्या या कालावधीत वर्षभरातील सर्वात उष्ण नऊ दिवस अनुभवायला मिळतात. उत्तर भारतात सूर्याचा दाह वाढत असताना 'नवतपा'मुळे नागरिकांचे हाल होणार आहेत. यंदा २५ मे ते २ जूनदरम्यान उत्तर भारतात नौतपा असेल.

राजस्थानमधील लोककथांमध्ये 'नवतपा'चा अर्थ लपलेला आहे. हिंदू पंचांगानुसार, जेव्हा सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, तेव्हा 'नवतपा'ची सुरुवात होते. यावेळी रोहिणी नक्षत्र सूर्याच्या अगदी जवळ पोहोचतं. या काळात सूर्याची किरणं पृथ्वीवर लंबवत पडतात. त्यामुळे भूभागाचे तापमान वाढते. जमिनीतील ओलसरपणा आणि गारवा सूर्य शोषुन घेतो आणि त्यामुळे उष्मा असह्य होतो. या संकल्पनेचा उगम जरी राजस्थानात झाला असला तरी याचा परिणाम उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, नवी दिल्ली, उत्तर प्रदेशसारख्या राज्यात सर्वाधिक जाणवतो.ज्योतिषीय गणितानुसार यंदा २५ मे रोजी दुपारी ३ वाजून २५ मिनिटांना हा नवतपा सुरू होणार आहे. त्यानंतर ३० ते ३१ मेदरम्यान वादळी उष्ण वाऱ्यांमुळे ही स्थिती वाढणार आहे. त्यानंतर २ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. दुसरीकडे, भारतीय हवामान विभागाचा यावर्षीचा अंदाजही नवतपाजवळच आहे. त्यानुसार पुढील १५ दिवस पंजाब, हरियाणा, नवी दिल्ली आणि राजधानीतील इतर भागांमध्ये तीव्र उष्णता आणि कोरडे वातावरण राहील. दिवसाचा पारा तर ४० ते ४४ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.दरम्यान, मध्य भारतातही पारा ४२ ते ४६ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यासह नवतपामध्ये रात्रीही दिलासा मिळत नसून उकाडा कायम राहतो. भारतीय हवामान विभाग नवतपाचे अधिकृतपणे समर्थन करत नसले तरी अनेकदा हा काळ मान्सूनपूर्व उष्णतेदरम्यानच सुरू होतो.

दिवसभर उष्म वारे वाहणार असून रात्रीही पारा चढेच राहणार आहे. असे मानले जाते की जितका तीव्र 'नवतपा' मान्सूनही तितकाच दिलासादायक असतो.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार अनेक शहरांमधील तापमान ४७ ते ४८ अंश सेल्सिअसदरम्यान पोहोचण्याची शक्यता आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशातील बांदा हे शहर जगातील सर्वात उष्ण शहर ठरलं आहे. बांदा येथील पारा आधीच ४७ अंशापार गेला असून 'नवतपा'दरम्यान आणखी वाढण्याची शक्यता आहे. राज्यातील कानपूर, प्रयागराज, झाशी, वाराणसी, नोएडा आणि आग्र्यामध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# एकीकडे गांधलीत जलक्रांती, तर अमळनेरमध्ये पाणीबाणी

## टँकरच्या संख्येत वाढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एकीकडे अमळनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये भूजल पातळी खालावत चालली असून टँकर व विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव वाढत आहेत, तर दुसरीकडे गांधली गावात करण्यात आलेल्या नाला खोलीकरणामुळे भूजल पातळीत तब्बल सात मीटरने वाढ झाल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे.

तालुक्यातील गांधली येथे विप्रो कंपनीच्या सीएसआर फंडातून तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर नाला खोलीकरणाचे काम करण्यात आले. या उपक्रमामुळे गांधलीसह परिसरातील पिळोदा, धुपी आदी सुमारे पाच किलोमीटर परिसरातील विहिरी व जलस्रोतांना मोठा लाभ झाला आहे. गावातील विहिरींची पाणी पातळी सात मीटरने वाढल्याचे सांगण्यात आले.

मात्र दुसरीकडे तालुक्यातील गडखांब, मांजर्डी, धुपी, दहिवद खुर्द, जुनोने, भोरटेक, पळासदळे, पाडसे, एकरुखी, मेहेरगाव, रामेश्वर बुद्रुक आदी गावांसाठी ११ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. तसेच उदयनगर, जानवे, तरवाडे या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या गावांसाठी अमळनेर, तासखेडा व धावडे येथील विहिरी टँकर भरण्यासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. आता मंगरूळ व गलवाडे बुद्रुक या गावांसाठीही टँकर प्रस्ताव आले असून खोकरपाट व बिलखेडा गावांच्या विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव प्रशासनाकडे दाखल झाले आहेत.

दरम्यान, धावडे येथून टँकर भरून दूरवर पाणीपुरवठा करावा लागत असल्याने वेळ, इंधन व आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गांधली परिसरात भूजल पातळी वाढल्याने येथील पाण्याचा उपयोग टँकर भरण्यासाठी केल्यास इंधन व शासनाच्या निधीची बचत होऊ शकते, असा विचार पुढे आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी गांधली येथून टँकर भरण्यासाठी सरपंच नरेंद्र पाटील यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते.



*अमळनेर : अधिग्रहीत केलेली विहीर.*

तालुक्यातील सुमारे १७ गावांच्या पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेल्या असल्या तरी वीज जोडणीअभावी त्या सुरू होऊ शकलेल्या नाहीत. परिणामी काही गावांमध्ये टँकर सुरू करण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठेकेदारांकडून नवीन आदेश व थकीत बिलांच्या मागण्या होत असल्याने कामे रखडल्याचे सांगितले जात आहे.

चौबारी गावातही विहीर अधिग्रहणाचा प्रस्ताव आला होता. मात्र तेथील पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर तुटलेली पाइपलाइन दुरुस्त करण्यात आली आणि पाणीपुरवठा सुरळीत सुरू झाल्याने विहीर अधिग्रहणाची गरज टळली.

तालुक्यातील वाढते पाणी संकट आणि त्यावर काही गावांमध्ये यशस्वी ठरत असलेले जलसंधारणाचे प्रयोग यामुळे प्रशासनासमोर दीर्घकालीन उपाययोजनांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# महिलेवर डुकराचा हल्ला

## आठवड्यात तिसरी घटना; मोकाट जनवारांना अभय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ऐंशी फुटी रस्त्यावर रात्रीच्या वेळेस फिरणाऱ्या महिलेवर डुकराने मागून हल्ला करीत जखमी केल्याची घटना काल ता. २० रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडली.

शहरातील मुंदडा नगर ते आर. के नगर भागातील ऐंशी फुटी रस्त्यावर रात्रीच्या वेळेस आठ ते दहा वाजेपर्यंत महिला व पुरुषांचा पायी फिरण्यासाठी गर्दी असते. काल रात्री महावीर नगर मधील महिला योगिता सहदेव पाटील त्यांच्या मुलीसोबत त्या ऐंशी फुटी रस्त्यावर फिरत असताना मागून अचानक त्यांच्यावर डुकराने हल्ला केल्याने त्यांना पायाला मोठया प्रमाणात जखमी झाल्याने त्यांना तात्काळ डॉ. अनिल शिंदे यांच्याकडे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांना गुडघ्याच्या मागील बाजूस चावा घेतला आहे. यावेळेस डुकराने केलेला हल्ला इतका भयावह होता की,सोबत असलेल्या मुलीने जोरदार प्रतिकार केल्यामुळे आईला ती या हल्ल्यातून वाचवून

पान २ वर

> **गावात फिरणारे मोकाट जनावरांबाबत नोटीसा दिल्या आहेत, मोकाट कुत्र्यांवरही बंदोबस्त करण्यात येणार असून प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक नोडेल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.त्यांनी त्या शालेय परिसरातील माहिती दिल्यास बंदोबस्त करण्यात येईल.शहरातील डुक्कर पालन करणारे यांना नोटीसा देण्यात आली आहे.त्यांनी आदेशाचे पालन न केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.**
>
> **किरण कंडारे** –स्वछता निरीक्षक नगर पालिका अमळनेर



*अमळनेर : गोधडीवाला धाम येथे भेटीप्रसंगी प.पू. हजुरीरुप साई साधराम साहेबजी.*

# प.पू. साई साधराम साहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## दुकाने व आस्थापने दुपारी १२ वाजेपर्यंत बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सिंधी समाजाचे महान श्रद्धास्थान आणि परम पूज्य हजूरी रूप साई साधराम साहेब यांचे दि. १९ मे रोजी ब्रह्मलीन झाले. दि. २१ मे रोजी त्यांच्या पार्थिवावर संत सतरामधाम,रेहडकी साहेब,सिंध येथे अंत्यसंस्कार होऊन ते पंचतत्वात विलीन झाले. या महान संताच्या जाण्याने संपूर्ण सिंधी समाज शोकसागरात बुडाला, साई साधराम साहेब यांच्या प्रती आदर आणि श्रद्धांजली व्यक्त करण्यासाठी अमळनेर शहरातील सिंधी समाजाचे दुकाने आणि व्यापारी आस्थापने दुपारी १२ वाजेपर्यंत उत्स्फूर्तपणे बंद ठेवण्यात आली होती.

परम पूज्य साई साधराम साहेब यांचे अमळनेर नगरीशी आणि येथील भाविकांशी अतिशय जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांनी आपल्या जीवनकाळात अमळनेर येथे तीन वेळा भेट दिली होती. त्यांच्या या आगमनामुळे अमळनेर शहर पावन झाले होते. आपल्या भेटीदरम्यान त्यांनी शहरातील धार्मिक व सामाजिक स्थळांना भेटी देऊन भाविकांना आशीर्वाद दिला होता.गोशाळा (कोचर पार्क),गोधडीवाला धाम (सिंधी कॉलनी),झुलेलाल मंदिर व श्री मंगळग्रह मंदिरासारख्या ऐतिहासिक आणि पवित्र स्थळाला भेट देऊन त्यांनी धार्मिक सलोखा आणि अध्यात्माचा संदेश दिला होता. त्यांच्या या भेटींच्या आठवणी आज अमळनेरवासीयांच्या मनात ताज्या आहेत.

कर्जापोटी किडनी विक्री करणाऱ्या रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीचा ५ लाखांचा धनादेश

पान २ वर






## संपादकीय




## कॉकरोच जनता पार्टी, 'डिजिटल बंड' व आव्हाने

नुकतीच डिजिटल विश्वात आणि पर्यायाने देशाच्या राजकीय वर्तुळात एक अभूतपूर्व आणि तितकीच धक्कादायक घडामोड घडली. देशातील बेरोजगार तरुणांच्या वृत्तीचे वर्णन करण्यासाठी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी वापरलेल्या "झुरळ" या शब्दाच्या निषेधार्थ सुरू झालेले 'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) अधिकृत 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) अकाउंट कायदेशीर मागण्यांमुळे बंद करण्यात आले आहे. इन्स्टाग्रामवर अवघ्या काही दिवसांत १२ दशलक्षांहून (१.२ कोटी) अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार करत सत्ताधारी भारतीय जनता पक्षालाही (८.७ दशलक्ष) मागे टाकणाऱ्या या डिजिटल चळवळीचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न म्हणजे भारतीय तरुणांच्या संतापाचा आणि अस्वस्थतेचा आरसा आहे.जीवशास्त्राच्या दृष्टीने विचार केला, तर झुरळ (कॉकरोच) हा असा जीव आहे जो कोणत्याही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, अगदी अणुबॉम्बच्या स्फोटातही स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवू शकतो. त्यांना स्वतःची अशी कोणतीही तत्त्वे नसतात, फक्त 'कसेही करून जिवंत राहणे' हाच त्यांचा एकमेव अजेंडा असतो. पुण्यातील पत्रकारितेचे शिक्षण आणि बोस्टन युनिव्हर्सिटीमधून जनसंपर्क विषयात पदव्युत्तर पदवी घेतलेले ३० वर्षीय राजकीय संवाद रणनीतिकार अभिजित दीपके यांनी १६ मे रोजी केवळ एक उपरोधिक मोहीम म्हणून 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना केली होती. "जर सर्व झुरळे एकत्र आली तर काय होईल?" या त्यांच्या एका प्रश्नाने देशातील कोट्यवधी तरुणांच्या भावनांना हात घातला. बघता बघता याचे एका मोठ्या आंदोलनात रूपांतर झाले.

या चळवळीचे स्वरूप जरी "अति-व्यंग्यात्मक" आणि "मीम-चालित" असले, तरी त्याला मिळालेला प्रतिसाद हा उपहासाच्या पलीकडचा होता. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, कीर्ती आझाद, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यापासून ते थेट हॉटमेलचे सह-संस्थापक सबीर भाटिया आणि ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांच्यापर्यंत अनेकांनी याला पाठिंबा दिला. चित्रपटसृष्टीतील अनुराग कश्यप, कोंकणा सेन शर्मा आणि प्रसिद्ध युट्युबर ध्रुव राठी यांसारख्या दिग्गजांचा पाठिंबा या चळवळीची व्याप्ती दर्शवतो. 'कॉकरोच जनता पार्टी' केवळ एका विधानावरील राग नव्हता, तर तो भारतातील ढासळत्या व्यवस्थेविरुद्धचा आक्रोश होता. आज भारतातील पदवीधरांचा बेरोजगारीचा दर २९.१ टक्के इतका प्रचंड आहे, जो अशिक्षितांच्या बेरोजगारीपेक्षा नऊ पटीने जास्त आहे. दरवर्षी ८० लाख पदवीधरांना सामावून घेण्याची ताकद सध्याच्या अर्थव्यवस्थेत नाही. यात भर म्हणून, 'सीजेपी'च्या स्थापनेच्या अवघ्या एक आठवडा आधी 'नीट' परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे देशभरात विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप होता. २१ जून २०२६ रोजी ही परीक्षा पुन्हा होणार असली, तरी परीक्षा पद्धतीवरील विद्यार्थ्यांचा विश्वास उडाला आहे. सीजेपीने काढलेले "येस, आय ॲम कॉकरोच" हे निषेध गीत याच फसवणुकीच्या आणि मानसिक दडपणाच्या छळाविरुद्धचा आवाज होता.

जरी ही चळवळ एका उपरोधातून सुरू झाली असली, तरी पक्षाच्या जाहीरनाम्यात देशातील अत्यंत गंभीर आणि संरचनात्मक समस्यांवर बोट ठेवण्यात आले आहे.माजी सरन्यायाधीशांनी सेवानिवृत्तीनंतर लगेचच राज्यसभेची जागा किंवा राज्यपालपद स्वीकारण्याच्या प्रथेवर यात कडक शब्दांत आक्षेप घेण्यात आला आहे. विद्यमान सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनीही अशा नियुयांवर नैतिक चिंता व्यक्त केली होती. सीजेपीने निवृत्त सरन्यायाधीशांना राज्यसभेच्या जागांवर बंदी घालण्याची पहिली आणि प्रमुख मागणी केली आहे. देशातील संपत्तीचे केंद्रीकरण काही मोजक्या उद्योगपतींच्या हातात होत असल्याचा आरोप करत, या पक्षाने कॉर्पोरेटधार्जिण्या आणि तथाकथित 'गोदी मीडिया'वर कडक कारवाईची मागणी केली आहे.निवडणूक रोखे किंवा अनामिक देणग्या न स्वीकारण्याचा आणि पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर २० वर्षांची निवडणूक बंदी घालण्याचा प्रस्ताव पक्षाने मांडला आहे. इन्स्टाग्रामवर सत्ताधारी पक्षाला मागे टाकल्यानंतर काही तासांतच सीजेपीचे 'एक्स' अकाउंट बंद केले जाणे हे बरेच काही सांगून जाते. "कायदेशीर मागण्यांमुळे अकाउंट रोखण्यात आले आहे" हा संदेश स्पष्ट करतो की, यंत्रणेला या डिजिटल एकजुटीची भीती वाटू लागली होती. 'द वायर'ने या संदर्भात रवांडातील नरसंहारादरम्यान वापरल्या गेलेल्या "इन्येन्झी" (झुरळ) या शब्दाशी केलेली ऐतिहासिक तुलना ही सरन्यायाधीशांच्या विधानाचा पूर्वग्रह दर्शवणारी आहे, असा युक्तिवाद प्रशांत भूषण यांनीही केला. सबीर भाटिया यांनी म्हटल्याप्रमाणे, "झुरळ हा सर्वात लवचिक जीव आहे जो सर्व संकटांतून वाचतो." तरुणांनी आपल्या हक्कांसाठी या लवचिकतेने लढण्याची गरज निर्माण झाली आहे. संस्थापक अभिजित दीपके यांनी मान्य केले आहे की, ही चळवळ कदाचित काही दिवसांत संपू शकते. परंतु, डिजिटल जगतातील हे अकाउंट बंद करून यंत्रणेने तरुणांचा तात्पुरता मार्ग रोखला असला, तरी त्यांच्या मनातील संताप ते दाबू शकलेले नाहीत. 'कॉकरोच जनता पार्टी'ने भारतीय तरुणांना आपली मते व्यक्त करण्यासाठी, व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ मिळवून दिले आहे. अकाउंट बंद करणे ही या चळवळीची शांतता नसून, भविष्यातील मोठ्या वैचारिक वादळाची नांदी ठरू शकते. लोकशाहीत जेव्हा मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि यंत्रणा जनतेचे प्रश्न मांडण्यात अपयशी ठरतात, तेव्हा असे 'डिजिटल बंड' उभे राहते आणि हेच या मोहिमेचे सर्वात मोठे यश आहे.



अमळनेर : बाल वारकऱ्यांसोबत ॲड. ललिता पाटील व प्राचार्य डॉ. निलेश चव्हाण.

# बाल वारकऱ्यांचा भक्तिरसात रंगलेला आगळावेगळा सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ॲड ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल येथे शुक्रवारी आयोजित उन्हाळी शिबिरात वारकरी संप्रदायाच्या भक्तिरसात चिंब झालेला आगळावेगळा सोहळा अनुभवायला मिळाला. आळंदी येथून आलेल्या 'बाल वारकरी मंडळाच्या लहानग्या संतांनी शाळेच्या प्रांगणात हजेरी लावताच अवघे वातावरण विठुनामाच्या गजराने दुमदुमून गेले.

या कार्यक्रमाला संस्था अध्यक्षा ॲड. ललिता पाटील, प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण तसेच मार्गदर्शनासाठी आळंदीहून आलेले ह.भ.प. सोपान शिरसाठ महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. टाळ-मृदुंगाच्या तालावर बाल वारकऱ्यांनी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' चा जयघोष करत फुगडी, पिंगा आणि गोल रिंगण सादर केले. पांढरा सदरा, धोतर, डोक्यावर टोपी आणि गळ्यात तुळशीमाळा परिधान केलेली ही चिमुकली वारकरी मंडळी पाहून उपस्थित सर्वजण भारावून गेले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते इयत्ता सातवीतील एका विद्यार्थिनीचे कीर्तन. 'विठ्ठल आवडी प्रेमभाव' या अभंगावर निरूपण करताना तिने संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या शिकवणीचा सोप्या भाषेत उलगडा केला. 'देव पाहायला मंदिरात जाऊ नका, तो आपल्या आई-वडिलांच्या सेवेत आहे' या तिच्या भावपूर्ण संदेशाने अनेकांच्या डोळ्यांत पाणी तरळले. तब्बल २० मिनिटे चाललेल्या या कीर्तनादरम्यान संपूर्ण सभागृह 'विठ्ठल विठ्ठल'च्या गजरात दंग झाले होते. कार्यक्रमाला पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

### बिनविरोधचा डाव फसला

## अमळनेर शेतकी संघ निवडणुकीत १५ जागांसाठी ४४ उमेदवार रिंगणात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुका शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीत एकूण १५५ उमेदवारांनी अर्ज भरले असताना. काल दि. २० रोजी माघारीच्या अखेरच्या दिवशी १११ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. माघारी अंती चित्र स्पष्ट होऊन १५ जागांसाठी ४४ उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले आहेत.

अर्ज माघारीसाठी २० मे रोजी अखेरची मुदत असताना सकाळपासून राष्ट्रवादी, भाजप व काँग्रेस तिन्ही पक्षाकडून सर्वपक्षीय पॅनल टाकून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला परंतु उमेदवार संख्या अधिक असल्याने व जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने नेत्यांचा प्रयत्न असफल ठरून तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे मैदानात उतरले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकार पॅनल रिंगणात उतरविले असून यात संपुर्ण १५ उमेदवारांचा समावेश आहे. तर भाजपाने खासदार स्मिता वाघ यांच्या नेतृत्वाखाली किसान विकास पॅनल गठीत केले असून यात १४ उमेदवार दिले आहेत. महिला राखीव गटात या पॅनेलने एकच उमेदवार दिला आहे. याशिवाय काँग्रेस पक्षाने शेतकरी पॅनल जाहीर केले असून या पॅनलने सोसायटी मतदारसंघात एकही उमेदवार दिला नसल्याने १० उमेदवारांचे पॅनल जाहीर केले आहे.

सदर निवडणुकीत वरील तीन पॅनलमध्ये लढत होईल असे चित्र स्पष्ट झाले आहे. अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर ही निवडणूक होत असल्याने या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले आहे असे आहे निवडणुकीचे चित्र - शेतकी संघात व्यक्तिशःच्या ५ जागांसाठी १८, सोसायटीच्या ५ जागांसाठी १०, महिला राखीव च्या २ जागांसाठी ५, ओबीसीच्या एका जागेसाठी ४, अनुसूचित जाती/जमातीच्या एका जागेसाठी ४, व्हीजेएनटी एका जागेकरिता ३ असे एकूण ४४ उमेदवार रिंगणात आहेत. व्यक्तिशः ५ आणि सोसायटीच्या ५ जागांसाठी अधिक चुरस दिसून येत आहे. याशिवाय इतर राखीव जागांवर देखील काही मातब्बर उमेदवार रिंगणात आहेत. माघारी नंतर आज २१ रोजी चिन्ह वाटप होऊन ३० मे रोजी मतदान व ३१ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे



## धावडेतील वाळू माफियांना आवर घाला

### सरपंच-ग्रामस्थांचे तहसिलदार यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील धावडे येथे तापी नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू असून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी धावडे येथील सरपंच व ग्रामस्थांनी केली आहे.

धावडे येथे दुसऱ्याच ठेक्यावरचे वाळू ठेकेदार बोटीने चोरटी वाहतूक करीत आहेत. गावकरी बोलायला गेले असता त्यांच्या अंगावर डंपर घालतात. धावडे येथून अनेक गावांना पाणी पुरवठा केला जातो. अशा भरमसाठ प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा झाल्यास पाणीपुरवठावर परिणाम होतील. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावे अशी मागणी तहसीलदार , उपविभागीय अधिकारी , जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे सरपंच व ग्रामस्थांनी केली आहे.

## अमळनेरात श्वान चावा प्रतिबंध जागृती कार्यक्रम

### विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम; पथनाट्याने जनजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन मुंबई, रोटरी क्लब ऑफ अमळनेर, श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे समाजकार्य महाविद्यालय अमळनेर आणि आधार बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्वान चावा प्रतिबंध जागृती कार्यक्रमाचे आयोजन रोटरी हॉल येथे करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी होते. यावेळी आशिष चौधरी, प्रतीक जैन, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र धनगर, समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. विजयकुमार वाघमारे तसेच आधार संस्थेच्या संचालक रेणू प्रसाद उपस्थित होते. श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन अभिजीत भांडारकर आणि आधार संस्था अध्यक्ष डॉ. भारती पाटील यांनी कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन मुंबईचे कार्यक्रम अधिकारी विवेक गोस्वामी यांनी प्रास्ताविक करत श्वान चावा प्रतिबंध व श्वान लसीकरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र धनगर यांनी श्वान हा शेतकऱ्यांचा मित्र आणि पाळीव प्राणी असल्याचे सांगत रेबीज आजाराबाबत मार्गदर्शन केले. कुत्रा चावल्यानंतर तातडीने उपचार घेणे आवश्यक असून रेबीज आजारावर उपचार मर्यादित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी समाजकार्य महाविद्यालय अमळनेर येथील स्वयंसेवक सागर कोळी, किर्ती सोनवणे, यामिनी माळी, अनुजा पाटील, सचिन सावळे, प्रज्ञा शिरूडकर, आकाश सैदाने आणि मोहिनी पाटील यांनी श्वान चावा प्रतिबंध जनजागृतीवर आधारित पथनाट्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजय कापडे, मुरलीधर बिरारी, राकेश महाजन, समाधान धनगर, मोहिनी धनगर, अश्विनी भदाणे, योगिता पाटील, ऊर्जिता शिसोदे, भावेश मराठे आणि माया जाधव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक संदानशीव यांनी केले तर आभार प्रदर्शन विवेक गोस्वामी यांनी मानले.




अमळनेर : रोटरी हॉल येथे आयोजित श्वान चावा प्रतिबंध जनजागृती पथनाट्य सादर केलेल्या चमू सोबत रोटरीयन्स.

# ऑनलाइन औषध विक्री विरोधात कडकडीत बंद

## अमळनेर तालुका औषध विक्रेत्यांचे तहसीलदारांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ऑनलाइन औषध विक्रीच्या माध्यमातून होत असलेल्या औषध विक्रीवर तातडीने बंदी घालण्यात यावी, तसेच केंद्र सरकारने कोविड काळात लागू केलेला जीएसआर२२०(ई) आदेश मागे घ्यावा या प्रमुख मागण्यांसाठी अमळनेर तालुका औषध विक्रेता संघाने बुधवारी (दि. २०) एक दिवसाचा कडकडीत बंद पाळत तहसीलदारांना निवेदन दिले.तालुक्यातील औषध विक्रेत्यांनी सकाळी १०.३० वाजता विजय मारुती मंदिरापासून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. यावेळी ऑनलाइन फार्मसीविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मोर्च्यानंतर तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशभरात इंटरनेट फार्मसीच्या माध्यमातून बेकायदेशीररीत्या औषधांची ऑनलाइन विक्री सुरू असून, याबाबत अनेक वेळा शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र, शासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अखेर बंद आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागला.ऑनलाइन फार्मसीमुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून, बंदी असलेली औषधे देखील सहज उपलब्ध होत असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध पुरवठा होणे हे अत्यंत धोकादायक असल्याचेही विक्रेत्यांनी सांगितले.

दरम्यान, बंद काळात रुग्णांना अडचण निर्माण होऊ नये यासाठी अत्यावश्यक सेवेसाठी प्रशासनाकडे संपर्क क्रमांक देण्यात आले होते. शहर व तालुक्यातील २०० हून अधिक औषध विक्रेता दुकानदारांनी या बंदमध्ये सहभाग नोंदविला.यावेळी अमळनेर तालुका औषध विक्रेता संघाचे अध्यक्ष प्रशांत पाटील, उपाध्यक्ष निलेश पाटील, सचिव प्रवीण माळी, खजिनदार रवींद्र चौधरी, जिल्हा प्रतिनिधी नरेंद्र पाटील, सुनील छाजेड, मुरलीधर चौधरी, सचिन चोपडा, हर्षल जैन, महेश पवार यांच्यासह मोठ्या संख्येने औषध विक्रेते उपस्थित होते.




अमळनेर : ऑनलाईन औषधी विक्रीच्या विरोधात तहसिलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन देताना संघटनेचे पदाधिकारी.

### डुकराचा हल्ला

पान १ वरून

लागलीच आरडा ओरड करीत आईला दवाखान्यात दाखल केले. मात्र या घटनेमुळे सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. एका आठवड्यात तीसरी घटना शहरात डुकरांचा वावर वाढला असून नगर पालिका प्रशासनाने यावर लागलीच कारवाई करीत डुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत असून ऐंशी फुटी रस्त्यावरील एका आठवड्यात तिसरी घटना असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. शाळकरी मुले, वृद्ध व्यक्ती यांना शहरात मोकाट फिरणाऱ्या कुत्रे, डुकरे, जनावरे यांचा त्रास वाढला असूनही प्रशासन कुंभकर्णी झोप घेत आहे का? असाही प्रश्न जनतेला पडला आहे.

# कर्जापोटी किडनी विक्री करणाऱ्या रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीचा ५ लाखांचा धनादेश

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मदतीचे वितरण; संकटातून उभारी देणारा शासनाचा आधार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतकरी रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या ५ लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश मंगळवारी दि.१९ रोजी चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सावकारीच्या विळख्यात अडकून किडनी विक्रीसारख्या अत्यंत वेदनादायी परिस्थितीला सामोरे जावे लागलेल्या रोशन कुळे आणि त्यांच्या कुटुंबासाठी हा क्षण दिलासादायक आणि नव्या आशेचा ठरला.





राज्यभर गाजलेल्या या प्रकरणात रोशन कुळे यांनी सावकारी जाचामुळे किडनी विकावी लागल्याचा गंभीर आरोप केला होता. या घटनेनंतर शासनाने प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मंजूर केली होती. त्या मदतीचा धनादेश अधिकृतरित्या वितरित करण्यात आला.ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, संकटाच्या अंधारात शासनाने दिलेला माणुसकीचा हात असल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी रोशन कुळे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या कुटुंबाची विचारपूस केली. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया सुरू असल्याचा विश्वास प्रशासनाकडून यावेळी व्यक्त करण्यात आला.

रोशन कुळे प्रकरणामुळे सावकारी जाच, शेतकऱ्यांची बिकट आर्थिक अवस्था आणि कथित अवयव तस्करीच्या प्रश्नांवर राज्यभर चर्चा सुरू झाली होती. या प्रकरणात आधीच काही आरोपींना अटक करण्यात आली असून, तपास यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू आहे. दरम्यान, मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेली ही मदत रोशन कुळे यांच्या आयुष्यात नव्या उभारीची सुरुवात ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### धनगर बिऱ्हाडे यांचे निधन



अमळनेर : येथील आर. के. पेट्रोल पंपासमोरील लक्ष्मी निर्मल हाईट्स, ओम साईनगर भागातील रहिवासी धनगर भुरा बिऱ्हाडे (वय ९०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी व गंधमुक्ती अर्थात उत्तर कार्याचा कार्यक्रम रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता वरील राहत्या घरी करण्याचे योजिले आहे. त्यांच्यामागे बंधू दिलीप वामन बिऱ्हाडे, तसेच मुलगे अशोक धनगर बिऱ्हाडे, उमेश धनगर बिऱ्हाडे, विजय धनगर बिऱ्हाडे, रवींद्र धनगर बिऱ्हाडे व पुतण्या मुकेश पुंडलिक बिऱ्हाडे यांच्यासह सुना, नातवंडे असा परिवार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# लग्नाची अनोखी पत्रिका अन् संपूर्ण गावाला विम्याचे सुरक्षा कवच!

## कंधारच्या पेठकर परिवाराचा आदर्श उपक्रम




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लग्न म्हटले की अवाढव्य खर्च, डीजेचा दणदणाट, रोषणाई आणि जेवणावळींची रेलचेल हेच चित्र डोळ्यासमोर येते. पण नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील बहादरपुरा येथे एका विवाह सोहळ्याने सामाजिक बांधिलकीचा एक अनोखा आणि कौतुकास्पद आदर्श समाजासमोर ठेवला आहे. नवरदेव सिद्धेश्वर आणि वधू मंजुषा यांच्या विवाह सोहळ्याचे औचित्य साधत पेठकर परिवाराने संपूर्ण बहादरपुरा गावातील तब्बल ३,५०० ग्रामस्थांचा अपघाती विमा उतरवला आहे. लग्नाची अनोखी भेट म्हणून संपूर्ण गावालाच विम्याचे सुरक्षा कवच देणारा हा महाराष्ट्रातील कदाचित पहिलाच प्रयोग असावा.


बहादरपुरा हे प्रामुख्याने शेती आणि मजुरी करणाऱ्यांचे गाव आहे. शेतात काम करताना सर्पदंश होणे, वन्य प्राण्यांचे हल्ले होणे किंवा रस्ते अपघात अशा दुर्दैवी घटना येथे वारंवार घडत असतात. नवरदेवाचे मोठे भाऊ अनुप पेठकर यांना दरमहा अशा अपघातांचे किमान २० फोन यायचे. अपघात झाल्यानंतर विम्या अभावी कुटुंबाची होणारी आर्थिक ओढाताण त्यांनी जवळून पाहिली होती. यातूनच कुटुंबात चर्चा झाली आणि छोट्या भावाच्या लग्नाचे निमित्त साधून गावालाच सुरक्षित करण्याचा संकल्प सोडण्यात आला.पेठकर परिवाराने गावातील मतदार यादीचा आधार घेत अधिकृतरीत्या ३,४०० ते ३,५०० नागरिकांची नोंदणी करून हा अपघाती विमा उतरवला आहे. भविष्यात कोणतीही दुर्दैवी किंवा अनुचित घटना घडल्यास संबंधित कुटुंबाला १ लाख रुपयांचे विमा कवच (इन्शुरन्स कव्हर) मिळणार आहे. यामुळे संकटसमयी ग्रामस्थांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.पेठकर परिवाराचा हा सामाजिक उपक्रम केवळ विम्यापुरता मर्यादित नव्हता. या विवाह सोहळ्याला उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांना रस्ते सुरक्षेचा संदेश देत शक्य तितक्या लोकांना 'हेल्मेट' घालून पाठवण्यात आले. गेल्या वर्षीही या कुटुंबाने इन्शुरन्स आणि हेल्मेट कॅम्प घेतला होता.आपल्या विवाहानिमित्त होत असलेल्या या उपक्रमाबद्दल वधू मंजुषा यांनी आनंद व्यक्त केला. "आमच्या लग्नाची ही एक छोटीशी पण अत्यंत बहुमूल्य भेट गावाला मिळत आहे, याचा मला मनापासून अभिमान वाटतो." फाजील खर्चाला फाटा देऊन, गावातील कष्टकरी जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा पेठकर परिवाराचा हा निर्णय सध्या सोशल मीडिया आणि परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे. लग्नाचा खर्च मर्यादित ठेवून समाजाला सुरक्षित करणारा हा "बहादरपुरा पॅटर्न" इतर विवाह सोहळ्यांसाठीही नक्कीच प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

> "आमच्या गावात शेती आणि मजुरी करणारा वर्ग मोठा आहे. काम करताना अनेकदा सर्पदंश किंवा जंगली प्राण्यांचे हल्ले होतात. अशा वेळी ग्रामस्थांना हक्काची मदत मिळावी म्हणून आम्ही पेठकर कुटुंबातर्फे मतदार यादीतील सर्व नागरिकांचा विमा काढला आहे."
>
> **सिद्धेश्वर भगवानराव पेठकर (नवरदेव)**

# रात्री ३ नंतर उडते झोप?

## शरीर काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करतेय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ना गजर. ना आवाज. फक्त पहाटेपूर्वी अचानक जाग येणे आणि मनात विचारांची गर्दी होती, तरी ते सहसा तसे नसते रात्री २ ते पहाटे ५ या वेळेत शरिरात हार्मोन्सची निर्मिती, शरीराचे तापमान आणि इतर अनेक शारीरिक प्रक्रियांवर नियंत्रण ठेवते. कॉर्टिसॉल जो आपल्याला सतर्क आणि जागृत ठेवणारा हार्मोन आहे, तो या वेळेत हळूहळू वाढू लागतो. त्यामुळे गजर वाजण्याच्या आधीच झोपेतून उठवते. मेंदू आरईएम झोपेलाच धोक्याचा संकेत समजतो. या अवस्थेत मेंदू आठवणी, भावना आणि दिवसातील न सुटलेले विचार प्रक्रिया करत असतो. पहाटेच्या वेळेत आरईएम झोप अधिक प्रमाणात असते. त्यामुळे याच टप्प्यात जाग येण्याची आणि ते लक्षात राहण्याची शक्यता जास्त असते. तर तुमच्या क्रोनोटाइपकडे लक्ष देणे आवश्यक ठरू शकते. तुमचे शरीर केवळ झोपेबद्दलच नाही, तर तुमच्या जीवनशैली, तणावाची पातळी आणि दैनंदिन लयीबद्दलही इशारा देत आहे.

**शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.**
**सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी**



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

**सीमा हॅण्डलूम हॉउस** पारोळा रोड, धुळे

# परम पूजनीय संत साई साधराम साहेब

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत साई साधराम साहेब हे सिंधी समाजातील एक अत्यंत आदरणीय, महान आणि दैवी व्यक्तिमत्त्व होते. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या 'शहानशहा संत शदाणी दरबार' (रायपूर, छत्तीसगड) चे ते नववे पीठाधीश (गादीनशीन) होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन मानवता, शांतता, आणि अध्यात्माच्या प्रसारासाठी समर्पित केले. साई साधराम साहेब यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९६१ रोजी पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील हयात पित्ताफी येथे एका अत्यंत धार्मिक कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये इतरांबद्दल दया, करुणा आणि ईश्वरी भक्तीचे गुण स्पष्टपणे दिसून येत होते. त्यांचे साधेपण आणि शांत स्वभाव सर्वांना आकर्षित करायचा.

संत शदाणी दरबार हा सिंधी हिंदू समाजाचा एक अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक आध्यात्मिक पंथ आहे. साई साधराम साहेब यांनी शदाणी दरबारचे आठवे पीठाधीश पूज्य साई गोबिंदराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यात्माचे धडे गिरवले. त्यांच्यातील अपार सेवाभाव, निष्ठा आणि योग्यता पाहून पूज्य साई गोबिंदराम साहेबांनी त्यांना आपले उत्तराधिकारी घोषित केले. त्यांच्या निर्वाणानंतर साई साधराम साहेब हे शदाणी दरबारच्या नवव्या गादीवर



विराजमान झाले.
साई साधराम साहेब हे केवळ धार्मिक गुरु नव्हते, तर ते एक थोर समाजसुधारक होते.सर्वधर्म समभाव त्यांच्या दरबारात जात, पात किंवा धर्माचा कोणताही भेदभाव नव्हता.गरीब मुलींचे विवाह लावून देणे, शिक्षण आणि आरोग्य सेवा पुरवणे यात शदाणी दरबार नेहमी अग्रेसर राहिला.फाळणीनंतर विखुरलेल्या सिंधी समाजाला एकत्र आणण्यात आणि त्यांच्यात सांस्कृतिक व आध्यात्मिक जाणिवा जिवंत ठेवण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले.त्यांनी आपल्या लाखो अनुयायांना शुद्ध, शाकाहारी जीवन जगण्याची आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याची शिकवण दिली.
अशा एका महान राष्ट्रसंत आणि आध्यात्मिक गुरुंचे आपल्यातून जाणे ही संपूर्ण सिंधी समाज आणि मानवजातीसाठी कधीही न भरून निघणारी मोठी हानी आहे.

आपल्या अथांग ज्ञानाने, करुणेने आणि प्रेमाने लाखो भक्तांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे, शदाणी दरबारचे नववे पीठाधीश परम पूजनीय संत साई साधराम साहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली!त्यांनी दिलेली मानवतेची आणि सद्गुणांची शिकवण आपल्या मनात नेहमी जिवंत राहील. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास आपल्या चरणी स्थान देवो आणि जगभरातील त्यांच्या लाखो अनुयायांना व शदाणी दरबार परिवाराला हे अथांग दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**॥ ॐ शांत शांत शांत ॥**
**अश्रूपूर्ण श्रद्धांजली!**

महेश : 9270633488
**जय शंकर स्टिल भांडार**
स्टिल, तांबा, पितल, अल्युमिनीयम, आहेरांचे व मुळचे भांडे सर्व वस्तु होलसेल भावात मिळतील
✻ पत्ता ✻
सिन्धी हाऊसिंग सोसायटी, तोलीणी मार्केट, अमळनेर, जि. जळगांव

अनिल कोराणी
9422281094
**कम्फर्ट**
लेडी वेअर
✻ पत्ता ✻
सुधाम क्लॉथ स्टोर्स समोर, शहीद हेमू कालानी मार्ग, अमळनेर-४२५४०१ जि. जळगांव (महाराष्ट्र)

**किशोर शूज**
सर्व प्रकारच्या नामांकीत कंपन्यांचे लेदर शुज, स्लीपर्स, सॅण्डल्स, स्कूल शूज उपलब्ध
संपर्क
विनोद लालवाणी : 9823595555
करण लालवाणी : 9420111155, 9068929999
महेश गेस्ट हाऊस आठवडे बाजार, अमळनेर

रमेश जिवनानी 9422771131
हितेन जिवनानी 9707979999
**सुजान कलेक्शन**
शहिद हेमू कलाणी मार्ग,अमळनेर, जि. जळगांव

**श्री. लालचंद हेमनदास सैनानी**
जिल्हा उपाध्यक्ष : भाजपा, जळगांव (पश्चिम)
मा. उपनगराध्यक्ष : अमळनेर नगरपरिषद, अमळनेर
मा. चेअरमन : अर्बन को-ऑप. बँक, अमळनेर
उपाध्यक्ष : शहर सिंधी जनरल पंचायत, अमळनेर
अध्यक्ष : पान मसाला असोशिएशन, अमळनेर
सदस्य : रोटरी क्लब, अमळनेर

**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**



**हजूरी रूप संत साईं साधराम साहेबजी**
के ब्रह्मलीन होने से समाज ने एक दिव्य प्रकाश खोया है, पर उनका आशीर्वाद और उपदेश सदैव हमारा मार्गदर्शन करते रहेंगे। देह भले ही दूर हुई, पर दिव्य प्रकाश अमर है, संतों का जीवन नहीं मिटता-उनका आशीष ही स्वर है।
ॐ शांति
॥ शोकाकूल ॥
**गोधडीवाला धाम**
**पुज्य शहर पंचायत,**
**पुज्य सिंधी कॉलनी पंचायत,**
अमलनेर, जि. जलगांव

॥ BNP ॥
Narendra Sainani 9422778902
Vicky Sainani 9270057547
ASS
**Amulmal Sugnomal Sainani**
Kunte Road, AMALNER Dist. Jalgaon

Shyam Goklani
9422275258
02587-223596
"KALAGURU", Ramnik wadi, Dheku Road, Amalner-425401
shyambrothers64@rediffmail.com
**Shyam & Brothers**
All building materials supplier

॥ श्री हनुमंत कृपा ॥
एस के ज्वेलर्स सन-१९८८
गोल्ड । डायमंड । सिल्वर
**नवीन जागेत**




**एसके ज्वेलर्स**
शाखा नं. 2
916 दागिन्यांना मजुरी 4% पासून
नगरपरिषद जवळ शॉपिंग कॉम्प्लेक्स स्टेशन रोड अमळनेर




# हरित त्रिवक्त्रा महिषवाहिनी उग्रतारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यह देवी आदिशक्ति का अत्यंत दुर्लभ और गुप्त तांत्रिक स्वरूप माना जाता है। शास्त्रों में वर्णित है कि जब पृथ्वी पर अधर्म, तंत्र का दुरुपयोग और मायावी शक्तियों का आतंक बढ़ने लगा, तब माँ भगवती ने अपने भीतर की "हरित कालशक्ति" को प्रकट किया। उसी तेज से इस दिव्य स्वरूप का उदय हुआ, जिसे ऋषियों ने "हरित त्रिवक्त्रा महिषवाहिनी उग्रतारा" नाम दिया।

देवी का हरा वर्ण केवल प्रकृति का प्रतीक नहीं है, अपितु यह प्राणशक्ति, मायाशक्ति और विनाश के बाद पुनर्जन्म का भी संकेत माना जाता है। तीन मुखों वाली यह देवी तीनों कालों भूत, वर्तमान और भविष्य पर अधिकार रखती हैं। पहला मुख क्रोध का, दूसरा करुणा का और तीसरा मायावी शक्तियों के विनाश का प्रतीक कहा गया है।

कथा है कि प्राचीन काल में "कर्कशासुर" नामक एक असुर ने घोर तंत्र साधना करके ऐसी शक्ति प्राप्त कर ली थी, जिससे वह लोगों के मन और प्राण को अपने वश में कर लेता था। वह भैंसे पर सवार होकर रात्रि में नगरों और श्मशानों में भ्रमण करता तथा साधकों की शक्तियाँ छीन लेता। देवता भी उसकी माया से भयभीत हो गए। तब भगवान शिव ने आदिशक्ति का ध्यान किया। शिव के त्रिनेत्र से निकली अग्नि और माँ काली की क्रोधाग्नि मिलकर एक दिव्य हरित प्रकाश में परिवर्तित हुई। उसी प्रकाश से देवी उग्रतारा प्रकट हुईं। आकाश में हरे विद्युत की चमक फैल गई, दिशाएँ काँप उठीं और श्मशान की अग्नियाँ स्वयं प्रज्वलित हो गईं।



देवी भैंसे पर आरूढ़ होकर युद्धभूमि में पहुँचीं। उनके तीनों मुखों से अलग-अलग मंत्रध्वनि निकलने लगी। एक ध्वनि से असुरों की माया टूटने लगी, दूसरी से अग्नि प्रकट हुई और तीसरी ध्वनि से कर्कशासुर की तांत्रिक शक्ति नष्ट हो गई। अंततः देवी ने अपने त्रिशूल से उसका अभिमान भेद दिया और उसे कालाग्नि में भस्म कर दिया।

युद्ध समाप्त होने के बाद देवताओं ने देवी की स्तुति करते हुए कहा **"हरितां त्रिमुखीं देवीं महिषारूढ़भैरवीम्। खत्रिशूलहस्तां तां उग्रतारां नमाम्यहम्॥"** अर्थात् हरे वर्ण वाली, तीन मुखों से सुशोभित, महिष पर विराजमान और हाथों में ख तथा त्रिशूल धारण करने वाली उग्रतारा देवी को मैं प्रणाम करता हूँ।

तांत्रिक परंपरा में माना जाता है कि यह देवी साधक के भीतर छिपे भय, भ्रम और नकारात्मक शक्तियों का नाश करती हैं। जो व्यक्ति निडर होकर इनका ध्यान करता है, उसके जीवन में साहस, तेज और अदृश्य रक्षा का उदय होता है। श्मशान, अमावस्या और गुप्त साधनाओं में इस स्वरूप की विशेष पूजा की जाती है।

कुछ साधक इन्हें माँ काली का हरित उग्र रूप मानते हैं, जबकि कुछ इन्हें माँ तारा और भैरवी की संयुक्त शक्ति बताते हैं। परंतु सभी मतों में एक बात समान कही गई है जहाँ अन्याय और मायावी अंधकार बढ़ता है, वहाँ हरित त्रिवक्त्रा उग्रतारा स्वयं प्रकट होकर संतुलन स्थापित करती हैं।

# लक्ष्मी निघून जाण्याची कारणे (अलक्ष्मीचे आगमन)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**इंद्रदेव आणि दुर्वास ऋषींची कथा (विष्णुपुराण)**

एकदा दुर्वास ऋषींनी इंद्रदेवाला एका दिव्य फुलांची माळ भेट दिली. ऐश्वर्याच्या अहंकारात चूर असलेल्या इंद्राने ती माळ आपल्या ऐरावत हत्तीच्या डोक्यावर ठेवली. हत्तीने ती माळ खाली पाडून पायाखाली तुडवली. ऋषींच्या या अपमानामुळे आणि इंद्राच्या अहंकारामुळे माता लक्ष्मी देवलोकातून (स्वर्गातून) नाहीशी झाली आणि थेट समुद्रामध्ये विलीन झाली. परिणामी, संपूर्ण स्वर्ग श्रीहीन (दरिद्री) आणि वैभवहीन झाला. नंतर देवांना लक्ष्मी प्राप्त करण्यासाठी 'समुद्रमंथन' करावे लागले.



* जे आळशी, देवावर विश्वास न ठेवणारे, अनैतिक, चोर आणि कपटी आहेत, त्यांच्यासोबत लक्ष्मी राहत नाही.

* जो आपल्या गुरूचा अनादर करतो, जो आपल्या गुरूच्या घरातून चोरी करतो किंवा जो आपल्या गुरूच्या पत्नीवर वाईट नजर टाकतो, अशा व्यक्तीच्या घरात लक्ष्मी राहत नाही.

* जो देवतेसाठी शिळी फुले वापरतो, अस्वच्छ आणि दुर्गंधीयुक्त राहतो किंवा तुटलेल्या किंवा फाटलेल्या आसनावर बसतो, अशा व्यक्तीच्या घरात लक्ष्मी राहत नाही.

* जो आपल्या पायांनी व्यक्तीच्या , अग्नीच्या, राखेच्या, आपल्या गुरूच्या किंवा आपल्या आईवडिलांच्या चरणांना स्पर्श करतो, त्याचे घर लक्ष्मी सोडून जाते.

* जो माणूस एक पाय दुसऱ्या पायावर घासून हात धुतो, घाणेरड्या जागी झोपतो, संध्याकाळी स्त्रीसोबत संभोग करतो किंवा दिवसा झोपतो, त्याच्या घरात लक्ष्मी कधीही वास करत नाही.

* जो माणूस घरात आणलेली किंवा घरी बनवलेली मिठाई घरातील लोकांना न देता स्वतः खातो आणि स्वयंपाकघरात भेदभाव करतो, त्याला लक्ष्मी कायमची सोडून देते.

* जो माणूस आपल्या शरीराला वाद्याप्रमाणे वाजवतो, किंवा बोटांनी टेबल-खुर्च्या आपटतो, किंवा आपले डोके व पाय अस्वच्छ ठेवतो, त्याला लक्ष्मी सोडून देते.

* जो माणूस अस्वच्छ कपडे घालतो, अंधाऱ्या घरात राहतो, कुरूप किंवा विचित्र पोशाख घालतो किंवा कोरडे अन्न खातो, त्याला लक्ष्मी नक्कीच सोडून देईल.

* जो माणूस आपल्या गळ्यातील हार चघळतो किंवा तोडतो, किंवा आळशी असतो, किंवा आपल्या शरीरावर धूळ ठेवतो, त्याला लक्ष्मी सोडून देते.

* जो दुसऱ्यांची संपत्ती बळकावतो, परस्त्रीसोबत लैंगिक संबंध ठेवतो, सूर्योदयानंतर झोपतो, जो खिळे, कोळसा, काटा किंवा गवताच्या काडीने जमिनीवर व्यर्थ लिहितो, अशा व्यक्तीच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* जो देवांची पूजा करत नाही, ज्याचे केस अस्ताव्यस्त असतात, जो ब्राह्मणांची निंदा करतो, जो विनाकारण बोटे फिरवतो, जो निरर्थक भाषणे देतो किंवा जो नग्न स्त्रियांकडे पाहतो, अशा व्यक्तीचा लक्ष्मी त्याग करते.

* जो विनाकारण हसतो, जेवताना हसतो, चालताना पाणी पितो, भूतकाळातील घटनांबद्दल चिंता किंवा दुःख व्यक्त करतो, जो उपकारकर्त्यांचे आभार मानत नाही, जो न विचारता कोणाकडे तरी बोलत जातो, अशा व्यक्तीच्या घरात लक्ष्मी कधीही वास करत नाही.

* जो बुद्धिमान नाही आणि संपत्ती मिळवण्यासाठी प्रयत्न करत नाही, अशा व्यक्तीच्या घरात लक्ष्मी कधीही वास करत नाही.

* जी स्त्री अस्वच्छ आहे, पापी कृत्यांमध्ये गुंतलेली आहे, परपुरुषांमध्ये रस घेते, जिचा स्वभाव भ्रष्ट आहे, जी प्रत्येक लहानसहान गोष्टीवर रागावते, आणि आपल्या पतीला दाबून ठेवण्यासाठी राग, दिखावा, फसवणूक किंवा खोटेपणाचा वापर करते, तिच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* जी स्त्री आपले घर सजवून ठेवत नाही, जिचे विचार चांगले नाहीत, जी सतत दुसऱ्यांच्या घरी भटकत राहते किंवा नियमितपणे घर सोडून दुसऱ्यांच्या घरी जाते, जिला लाज वाटत नाही, तिच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* जी स्त्री निर्दयी, स्वभावाने क्रूर आहे, दुसऱ्यांविषयी चहाडी करण्यास तयार असते, आणि इतरांमध्ये भांडणे लावून स्वतःला हुशार समजते, तिच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* ज्या स्त्रीवर तिच्या पतीचे प्रेम नाही, तिच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* ज्या स्त्रीच्या घरात पूजेचे स्थान नसते, जी देवतांसमोर आरती व धूप जाळत नाही आणि जी स्वतः आरती गात नाही, तिच्या घरात लक्ष्मी नसते.

* जी स्त्री आपल्या गुरूचा अनादर करते, तिच्या घरात क्षणभरासाठीही लक्ष्मी नसते.

* ज्या व्यक्तीला गुरू नसतो, त्याच्या घरात लक्ष्मी नसते.

* जी स्त्री अति खाते, स्वयंपाक करताना खाते किंवा शिळे अन्न वाढते, तिच्या घरात लक्ष्मी नसते.

* जी स्त्री दिवसा झोपते आणि आपल्या आई-वडिलांचा व सासू-सासऱ्यांचा आदर करत नाही, तिच्या घरात लक्ष्मी नसते.

* ज्या व्यक्तीच्या हृदयात स्नेह नसतो आणि ज्याला इतरांचे दुःख पाहून वाईट वाटत नाही, त्याच्या घरात लक्ष्मी नसते.

* जो व्यक्ती प्रयत्नशून्य आणि निष्क्रिय असतो, त्याच्या घरात लक्ष्मी नसते.

* जो व्यक्ती आपल्या घरात शिव, विष्णू, गणपती आणि शालिग्राम यांची स्थापना करून त्यांची रोज पूजा करत नाही, त्याच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* जो व्यक्ती लक्ष्मीशी संबंधित स्तोत्रे, मंत्र इत्यादींचे पठण करत नाही, जो अनावश्यक खर्च करतो, किंवा ज्याला केवळ सुखातच आनंद मिळतो, त्याच्या घरात लक्ष्मी वास करत नाही.

* ज्या व्यक्तीच्या घरात कलह असतो, जो प्रत्येक लहानसहान गोष्टीवरून आपल्या पत्नीचा अपमान करतो, जो आपल्या पत्नीला नोकरासारखी वागणूक देतो, जो आपल्या पत्नीला तिच्या सुख-दुःखात मदत करत नाही, त्याच्या घरात लक्ष्मी कधीही कायमची वास करत नाही.

**ॐ क्रीम कलिकाय नमः**
**ॐ ह्रौम अघोर शिवाय नमः**

# अधिकमासात चांदीची जोडवी देणे का मानले जाते पुण्याचे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अधिकमास**

अधिकमासाला हिंदू धर्मात अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी महिना मानले जाते.

**भेट** : या महिन्यात विवाहित मुलीला चांदीची जोडवी भेट देण्याची खास परंपरा आहे.

**जोडवी** : जोडवी देणे म्हणजे लेकीच्या सुखी संसारासाठी आशीर्वाद दिल्यासारखे मानले जाते.

**चांदी** : शास्त्रानुसार चांदी ही चंद्राची धातू असून, ती



मनःशांती आणि आरोग्याचे प्रतीक मानली जाते.

**पाय** : जोडवीमुळे पायातील नसांवर सौम्य दाब पडून आरोग्यास फायदा होतो.

**प्रेम** : चांदीची जोडवी पती-पत्नीतील प्रेम आणि समजूतदारपणा वाढवते असे मानले जाते.

**दान** : अधिकमासात केलेले दान आणि धार्मिक कार्य विशेष पुण्यदायी मानले जाते.

**परंपरा** : म्हणूनच अधिकमासात लेकीला जोडवी देण्याची परंपरा आजही श्रद्धेने पाळली जाते.

# देवी लक्ष्मीच्या उत्पत्तीच्या कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात देवी लक्ष्मी ही संपत्ती, समृद्धी, सुदैव आणि कल्याणाची प्रमुख देवी आहे. ती भगवान विष्णूची पत्नी आणि 'त्रिमूर्ती' देवींपैकी (पार्वती, सरस्वती आणि लक्ष्मी) एक आहे. पुराणांमध्ये प्रामुख्याने देवी लक्ष्मीच्या जन्माच्या दोन कथा सांगितल्या आहेत . विष्णू पुराणानुसार, जेव्हा देव आणि दानवांनी अमृत मिळवण्यासाठी दुधाच्या समुद्राचे मंथन केले, तेव्हा चौदा रत्ने निर्माण झाली. या रत्नांमधून देवी लक्ष्मी कमळाच्या फुलावर विराजमान होऊन प्रकट झाली. तिने दानवांचा त्याग केला, देवांची बाजू निवडली आणि भगवान विष्णूला आपला शाश्वत पती म्हणून स्वीकारले. गरुड पुराण आणि पद्म पुराण यांसारख्या काही ग्रंथांनुसार, ती महर्षी भृगू आणि त्यांची पत्नी ख्याती यांची कन्या होती. या रूपात तिला भार्गवी म्हणूनही ओळखले जाते.




**प्राचीन इतिहास आणि विकास**

वेदांमध्ये देवी लक्ष्मीला 'श्री' (समृद्धी आणि सुदैवाचे प्रतीक) म्हणून ओळखले जाते. 'श्रीसूक्त' तिच्या वैभवाचे वर्णन करते.उत्तर भारतात, देवी लक्ष्मीची चित्रे कौशांबी येथील मूर्तींवर (इ.स.पू. तिसरे शतक) आणि गुप्त राजवंशाच्या (इ.स. चौथे शतक) नाण्यांवर आढळतात.शतकानुशतके राजे आणि व्यापारी शक्ती, राजपद आणि व्यवसायातील यशासाठी तिची पूजा करत आले आहेत.तिला चार हातांनी आणि कमळाच्या फुलावर बसलेली दाखवले जाते, जे पवित्रता आणि आध्यात्मिक ज्ञानाचे प्रतीक आहे. तिच्या हातात संपत्तीचा कलश आणि आशीर्वादाची मुद्रा आहे.हिंदू धर्मात, तिला भगवान विष्णूची सक्रिय शक्ती (पत्नी) मानले जाते, जी विश्वाच्या कार्यासाठी जबाबदार आहे. दिवाळीत तिची विशेषतः संपत्तीची देवी म्हणून पूजा केली जाते.'अष्टलक्ष्मी' म्हटली जाणारी तिची आठ प्रमुख रूपे संपत्तीच्या विविध स्रोतांवर (जसे की भौतिक, आध्यात्मिक, कृषी आणि शौर्य) नियंत्रण ठेवतात.

# कपाळावर चंदन लावल्याने थेट मेंदूवर काय परिणाम होतो? जाणून घ्या विज्ञान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**'थर्ड आय' नर्व्ह सेंटर** : कपाळाचा मध्यभाग हा शरीरातील सर्वात मोठ्या क्रेनियल सेन्सर सिस्टम्सपैकी एक असलेल्या 'ट्रायजेमिनल नर्व्ह नेटवर्क'शी थेट जोडलेला असतो.

**चंदन उष्णता शोषून घेते** : चंदनामधील 'अल्फा-सँटालॉल' संयुगे त्वचेच्या थर्मोरेसेप्टर्सशी संवाद साधून कपाळावरील रक्तवाहिन्या थंड करतात आणि चयापचयाची उष्णता कमी करतात.

**रिलॅक्सेशन सिग्नल्स ॲक्टिव्हेट होतात** : कपाळाला मिळणाऱ्या या थंडाव्यामुळे मेंदूच्या 'मेडुला' भागाकडे शांततेचे संकेत जातात, ज्यामुळे शरीर नैसर्गिकरित्या पॅरासिम्पेथेटिक रिकव्हरी मोडमध्ये जाते.

**पिनिअल ग्लँड आणि चांगली झोप** : कपाळाचा भाग थंड ठेवल्याने मेंदूतील 'पिनिअल ग्लँड'द्वारे मेलाटोनिन संप्रेरकाची निर्मिती नियंत्रित होण्यास मदत होते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते.

**तणाव संप्रेरके कमी होतात** : चंदनाचा सुगंध थेट ऑल्फॅक्टरी प्रणालीला उत्तेजित करतो, ज्यामुळे शरीरातील कोर्टिसोल या स्ट्रेस हार्मोनची पातळी झपाट्याने कमी होते.

**चेहऱ्याच्या स्नायूंचा ताण कमी होतो** : कपाळावर लावलेला चंदनाचा लेप जसजसा सुकू लागतो, तसतसे कपाळाच्या स्नायूंची जाणीव वाढते आणि डोकेदुखी किंवा डोळ्यांवर येणारा ताण कमी होतो.

**प्राचीन विधींमागील प्रगत विज्ञान** : प्राचीन संस्कृतींनी प्रगत न्यूरोलॉजिकल तंत्रांना धार्मिक परंपरेचे रूप दिले, जेणेकरून लोकांनी दररोज या फायदेशीर सवयींचे पालन करावे.

# तेहतीस कोटि देव कोणते ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहुतेक लोकांना 'तेहतीस कोटि' चा अर्थ 'तेहतीस करोड' असाच वाटत असतो .पण येथे कोटि शब्दाची, 'टि' पहिली वेलांटी आहे.

मुळात संस्कृतमधील "कोटि" या शब्दाचा अर्थ करोड नसून 'प्रकार' असा आहे. खरे संशोधन असे केले गेले आहे की, ईश्वराने निसर्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी ३३ प्रकारच्या देवांना कार्यभार सोपवले आहेत.



त्यांच्यात ८ वसू, ११ रूद्र, १२ आदीत्य, १ इंद्र आणि १ प्रजापती असे पाच स्तर आहेत .

प्रत्येकाचा कार्यभाग (खाते) भिन्न असल्याने प्रत्येकाला वेगळी कोटि (कॅटेगरी) दिलेली आहे. अष्टवसूंची नावे - आप, धृव, सोम, धर, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास .

अकरा रूद्रांची नावे - मनु, मन्यु, महत, शिव, ऋतुध्वज, महीनस, उम्रतेरस, काल, वामदेव, भव आणि धृत-ध्वज.

बारा आदित्यांची नावे - अंशुमान, अर्यमन, इंद्र, त्वष्टा, धानू, पर्जन्य, पूषन, भग, मित्र, वरूण, वैवस्वत व विष्णू

१ इंद्र आणि १ प्रजापती

असे एकंदर
८+११+१२+१+१ = ३३

# यंदाचा अधिकमास विशेष; ३ दुर्मिळ महायोग

## पुढील ११ वर्षे घडणार नाही असा योग; 'या' ४ राशींना होणार जादा फायदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात दर तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या अधिकमासाला विशेष महत्त्व दिले जाते. या महत्त्वाच्या आणि पवित्र महिन्याची सुरूवात १७ मेपासून झाली असून १५ जून २०२६ ला अधिकमास संपेल. विशेष म्हणजे या काळात अनेक शुभ योग तयार होतील. या ३० दिवसांच्या कालावधीत गुरु-पुष्य योग दोनदा तयार होईल. हा एक अत्यंत दुर्मिळ योगायोग आहे. कारण सहसा एका महिन्यात फक्त एकच पुष्य नक्षत्र असते. दुसरे म्हणजे ज्येष्ठ महिन्याच्या मध्यात अधिक मास येणे हा देखील एक दुर्मिळ योगायोग आहे. तिसरे म्हणजे या काळात गजकेसरी योग आणि पुष्कर योग यांसारखे शुभ योग देखील तयार होतील. या कारणांमुळे, २०२६ चा अधिक मास खूप विशेष मानला जातो. तसेच असा योगायोग यानंतर २०३७ मध्ये पाहायला मिळेल. या अधिकमासाचा फायदा काही



राशींना होणार आहे. कोणत्या आहेत त्या भाग्यवान राशी जाणून घेऊ.

**वृषभ**

अधिक मास वृषभ राशीसाठी अत्यंत शुभ ठरेल. तुमच्या सुखसोयी आणि ऐश्वर्य वाढेल. तसेच या काळात तुमची आर्थिक परिस्थिती खूप मजबूत होईल आणि तुम्हाला देवी लक्ष्मीचा विशेष आशीर्वाद मिळेल. या महिन्याभराच्या काळात मालमत्ता, नवीन घर किंवा वाहन खरेदी करण्यासाठी शुभ संधी निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. वडिलोपार्जित मालमत्तेतून चांगले लाभ मिळण्याची शक्यता आहे. तुमचे अडकलेले पैसे या काळात परत मिळवता येऊ शकतात. या काळात इच्छित नोकरी मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह**

अधिकमासामुळे सिंह राशीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होईल. तुम्ही कर्जमुक्त व्हाल. या काळात तुम्ही काही नवीन काम सुरू करू शकता. तसेच जुन्या गुंतवणुकीतून भरघोस नफा मिळण्याची आशा आहे. तुम्हाला कुटुंबासोबत चांगला वेळ घालवता येणार आहे. या शुभ काळात कुटुंबामध्ये एखादी शुभ घटना घडू शकते. व्यवसायात अचानक प्रगती होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**

वृश्चिक राशीच्या लोकांसाठी हा सुवर्णकाळ ठरणार आहे. या काळात तुम्हाला अनेक कामांमध्ये यश मिळेल तसेच उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. या काळात प्रमोशन मिळण्याची शक्यताही आहे. अचानक आर्थिक लाभ होण्याची शुभ शक्यता आहे. तुम्हाला एखाद्या कामात मोठे यश मिळू शकते.

**कुंभ**

कुंभ राशीच्या लोकांसाठी हा सुवर्णकाळ आहे. तुमची कोणतीही अपूर्ण इच्छा पूर्ण होऊ शकते. अनेक मार्गांनी पैसे मिळण्याची शक्यता असते. एखाद्या कामात मोठे यश मिळण्याची आशा आहे. रखडलेले काम पूर्ण होईल, तर काही कामांमध्ये तुम्हाला तुमच्या पालकांकडून उत्तम पाठिंबा मिळेल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)